Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# माणसांतील गुंतवणूक

16 Sep 2011, 0335 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

कोणताही उद्योग, व्यवसाय म्हटला की त्यात गुंतवणूक ही आलीच. साधारणपणे गुंतवणूक म्हटल्यावर नजरेसमोर व्यवसायातील भ ांडवल, लागणारी यंत्रसामग्री, कच्चा माल, जागा/ इमारत, वाहने अशा गोष्टी येतात. पण या सगळ्यांइतकीच महत्त्वाची असतात ती त्या व्यवसायाला लागणारी माणसं. तुम्ही आधुनिक यंत्रे आणलीत, अद्ययावत तंत्रज्ञान वापरलेत, भरपूर सुविधा निर्माण केल्यात, पण हे सगळे वापरणारे तुमचे कर्मचारी पुरेसे सक्षम नसतील किंवा त्यांच्या कामाबाबत पुरेसे गंभीर नसतील तर तुमच्या बाकीच्या गुंतवणुकीला काही अर्थ राहत नाही. कोणत्याही उद्योग व्यवसायाचे यशापयश तेथे काम करणाऱ्या माणसांच्या कार्य-क्षमतेवर अवलंबून असते. त्यामुळेच आधुनिक व्यवस्थापन-शास्त्रात मनुष्यबळ व्यवस्थापनाला अधिक महत्त्व दिले आहे.

मनुष्यबळ व्यवस्थापनातील महत्त्वाचा भाग म्हणजे आपल्या उद्योगाला, व्यवसायाला अनुकूल असा कर्मचारी घडवणे. रामदास स्वामींनी त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात याच गोष्टीवर लक्ष केंदित केले होते. मात्र तेव्हाची राजकीय, सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी सर्वसामान्य माणसांवर राष्ट्रप्रेमाचे, देशभक्तीचे संस्कार करून त्यांचे चारित्र्य घडवण्याचे कार्य केले. सर्वसामान्य माणसाची सर्व शक्ती रचनात्मक, विधायक कार्यासाठी कशी वापरता येईल याकडे त्यांनी लक्ष दिले. माणसाचा स्वभाव हा त्याला सुखी किंवा दु:खी करणारा सगळ्यात महत्त्वाचा घटक आहे. पण हा स्वभाव संस्काराने बदलणे शक्य आहे, हे रामदास स्वामी जाणून होते. चरित्र घडवणे किंवा स्वभाव बदलणे कसे शक्य आहे हे सांगताना ते म्हणतात....

अवगुण सोडिता जाती। उत्तम गुण अभ्यासिता येती। कुविद्या सांडुनी सिकती। शाहाणे विद्या।।

मूर्खपणा सांडिता जाते। शहाणपण सिकता येते। कारभार करता उमजते। सकळ काही।।

प्रयत्न केल्यास अवगुण जातात, चांगल्या सवयी लागू शकतात. वाईट गोष्टींचा नाद सुटू शकतो, मूर्खपणाही जातो आणि अंगी शहाणपण येते.

जैसे जैसे करावे। तैसे तैसे पावावे। हे जयास नेणवे। तो येक मूर्ख।।

आपण जसे वागू तसे फळ आपल्याला मिळते ही अगदी साधी गोष्ट तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांच्या मनात ठसवलीत तरी त्याचा अपेक्षित परिणाम दिसून येतो. तुमच्या आथिर्क गुंतवणुकीची तुम्ही काळजी घेता त्याचप्रमाणे मनुष्यबळातील गुंतवणुकीचीही काळजी घ्या. त्यांना त्यांच्या कामात आनंद घ्यायला शिकवा, म्हणजे आपोआप त्यांच्या कामाचा दर्जा सुधारलेला दिसून येईल. आपल्या कर्मचाऱ्यांकडून काम करून घेताना ते कोणतं काम करतात, यापेक्षा ते कसं काम करतात याकडे लक्ष पुरवा. जोपर्यंत तुम्ही तुमच्या कामगारांचे, सहकाऱ्यांचे चारित्र्य घडवत नाही तोपर्यंत तुम्हाला अपेक्षित असलेली प्रगती शक्य नाही. माझ्या बांधकाम व्यवसायापासून ते मी करत असलेल्या शेतीपर्यंत प्रत्येक ठिकाणी माणसांमधील गुंतवणूक सांभाळल्यानेच माझी भरभराट झाली.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768